**जिल्हा परिषद ,यवतमाळ**
**पंचायत विभाग**
**आर्णी रोड, यवतमाळ- ४४५००१**

दुरध्वनी क्रमांक - ०७२३२-२४४४७१
ईमेल:ceozp.yavatmal@maharashtra.go v.in
वेबसाईट :- www.zpyavatmal.gov.in

क्रमांक/यजिप/पंचायत/आस्था-१/कावि/ ३३६८/२०२५

दिनांक- २१ एप्रिल २०२५

**प्रति,**

**गट विकास अधिकारी,**
**पंचायत समिती-------------------------(सर्व)**

**विषय -** **सन २०२५ मधील सर्वसाधारण बदल्यांच्या अनुषंगाने विस्तार अधिकारी (पं) व ग्रामपंचायत अधिकारी या संवर्गातील कर्मचा-यांच्या वास्तव्य कालावधीच्या ~~अंतीम~~ तात्पुरती जेष्ठता याद्या प्रसिध्द करणेबाबत.**

**संदर्भ :-**

१.शासन निर्णय, (ग्राम विकास विभाग) क्र.जिपब-४१४/प्र.क्र.११२/आस्था-१४ दि.१५ मे २०१४.
२. शासन शुध्दीपत्रक क्रमांक:जिपब-४१४/प्र.क्र.११२/आस्था-१४,दि.२ जुलै २०१४
३. शासन शुध्दीपत्रक क्रमांक:जिपब-४८१६/प्र.क्र.१३६/आस्था-१४,दि.२ जानेवारी २०१७
४. शासन पुरकपत्र क्रमांक:जिपब-४८१७/प्र.क्र.२२८/आस्था-१४,दि.७ मार्च २०१९
५. शासन शुध्दीपत्रक क्रमांक:जिपब-४८१७/प्र.क्र.२२८/आस्था-१४,दि.८ मार्च २०१९
६. शासन पुरकपत्र क्रमाक/जिपब-४८१७/प्र.क्र./आस्था-१४, दि. २८ मार्च २०२५
७.या कार्यालयाचे पत्र क्रमांक यजिप/पंचायत/आस्थ-१/कावि/२९२/२०२५दि.२ फेंबृवारी २५

उपरोक्त संदर्भीय क्रमांक १ ते ६ अन्वये सन २०२५ मधील सर्वसाधारण बदल्याकरीता वास्तव्य सेवा जेष्ठता यादया तयार करण्यासाठी संदर्भीय क्रमांक ७ अन्वये विस्तार अधिकारी (पंचा) व ग्रामपंचायत अधिकारी संवर्गाचे गट -क कर्मचाऱ्यांची सर्व पंचायत समितीकडून माहिती आली होती. त्याअनुषंगाने प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे विस्तार अधिकारी (पंचा.) व ग्रामपंचायत अधिकारी या संवर्गाच्या वास्तव्य सेवा जेष्ठता याद्या तयार करुन, यवतमाळ जिल्हा परिषदेच्या (www.zpyavatmal.gov.in) या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. तसेच पंचायत समिती सर्व यांच्या ई-मेल व्दारेही पाठविण्यात येत आहे.आपण सदर याद्या यवतमाळ जिल्हा परिषदेच्या (www.zpyavatmal.gov.in) या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्याची माहिती, सर्व संबंधीतांना देण्यात यावी. या संबंधात कर्मचाऱ्यांचे काही आक्षेप/हरकती असल्यास योग्य त्या पुराव्यासह दिनांक ३० एप्रिल २०२५ पर्यंत या कर्यालयास सादर करावे.

तसेच सदर तात्पुरत्या वास्तव्य जेष्ठता यादीतील विस्तार अधिकारी (पंचा) व ग्रामपंचायत अधिकारी यांचे सेवाकालावधी व इतर बाबी तपासून त्यात काही त्रुटी आढळल्यास किंवा सुधारणा करावयाची असल्यास तसे दिनांक ३० एप्रिल २०२५ पर्यंत पंचायत विभागास योग्य त्या पुराव्यासह कळवावे.

**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचा.)**
**जिल्हा परिषद,यवतमाळ**

प्रतिलिपी :-

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,यवतमाळ माहीती करिता सविनय सादर.